# **Kiosk Machines Comprehensive - AMC**

## **दुरूस्ती व देखभाल करणेबाबत जाहीर नोटीस**

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो, कोल्हापूर यांचे आदेशान्वये जाहीर करणेत येते कि, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व यांचे अधिपत्याखालील असणारे जिल्हा न्यायालये, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, दिवाणी न्यायालये कनिष्ठ स्तर, या कोल्हापूर मुख्यालय व तालुका न्यायालयातील वापरात असलेले १७ **Kiosk Machines** मशीनचे स्थानिक पातळीवर (**Comprehensive-AMC with all components)** दुरूस्ती व देखभाल वार्षिक करार करणेसाठी मोहोरबंद दरपत्रक (निविदा) मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक सेवाधारकांनी सदरची जाहिरात प्रसिध्द झाले पासून चार दिवसाच्या आत **Kiosk** मशीनची पहाणी व माहिती घेणे करिता मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथील संगणक विभाग येथे प्रत्यक्ष भेट देउन सदरची निविदा भरणेचे आहे. नोंदणीकृत व इच्छुक सेवाधारका कडून सदरची जाहीरात प्रसिध्द झालेपासून दिनांक **१९/१२/२०२४** रोजी दुपारी २.०० वाजेपर्यत मोहोरबंद निविदा सादर करावयाच्या आहेत. याची निविदाधारकानी नोंद घ्यावी. ज्यांना निवीदा भरणेचे आहेत त्यांनी खालील अटीस पात्र राहून दिनांक. **१९/१२/२०२४** रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे पोहचतील अशा रितीने निवीदा सादर कराव्यात. **या सोबत Kiosk Machines बाबत माहितीसाठी Annexure-I व दुरूस्ती व देखभाल करणेसाठी नियम व अटी सोबत जोडलेले आहेत.**

DISTRICT COURT OF KOLHAPUR
डिस्ट्रिक्ट कोर्ट
सत्यमेव जयते
कोल्हापूर

हुकूमावरून,

सहा.अधिक्षक (वित्त),
जिल्हा व सत्र न्यायालय,कोल्हापूर.

दिनांक - ०५/१२/२०२४

## Annexure – A

| Sr. No. | Name of Court Complex | Make and Model | Qty. |
|---|---|---|---|
| 1 | District Court Kolhapur | **Dell E2218 HN Touch Screen : PCAP 22"**<br><br>Infinitas i-300 Pedestal Model Bajaj or Tata Steel<br><br>Processor i-3-7100, RAM 4GB, 500 GB HDD, HDMI with UPS Power YPB 600 VA, AC Adapter : M inter : 12V – 1A – USB | 02 |
| 2 | District Court-1, Ichalkaranji | As above | 01 |
| 3 | District Court-1 Gadhinglaj | As above | 01 |
| 4 | District Court-1 Jaysingpur | As above | 01 |
| 5 | Civil and Criminal Court Kagal | As above | 01 |
| 6 | Civil and Criminal Court Ajara | As above | 01 |
| 7 | Civil and Criminal Court Chandgad | As above | 01 |
| 8 | Civil and Criminal Court Gadhinglaj | As above | 01 |
| 9 | Civil and Criminal Court Gargoti | As above | 01 |
| 10 | Civil and Criminal Court Jaysingpur | As above | 01 |
| 11 | Civil and Criminal Court Kurundwad | As above | 01 |
| 12 | Civil and Criminal Court Panhala | As above | 01 |
| 13 | Civil and Criminal Court Vadgaon | As above | 01 |
| 14 | Civil and Criminal Court Shahuwadi | As above | 01 |
| 15 | Civil and Criminal Court Kale | As above | 01 |
| 16 | Civil and Criminal Court Radhanagari | As above | 01 |
| | | **Total** | **17** |

# दुरूस्ती व देखभाल करणेसाठी नियम व अटी खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| ०१. | मोहरबंद निविदा हे मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश कोल्हापूर या नावाने दिनांक १९/१२/२०२४ इ रोजी कार्यालयीन वेळे पर्यत सुटटीचे दिवस वगळून किंवा त्यापुर्वी या कार्यालयास पोचतील अशा बेताने सादर करावयात त्यानंतर प्राप्त झालेले दरपत्रके स्विकारलया जाणार नाहीत. |
| ०२. | सदरहु दरपत्रक सुचनेतील नमुद सव्हरसाठी कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्यावर कोणत्याही क्षणी अथवा संपुर्णत वगळण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो कोल्हापूर यांना राखुन ठेवले आहेत. |
| ०३. | कोणतीही एक अथवा सर्व दरपत्रके कारण न देता नकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश कोल्हापूर यांनी स्वत:कडे ठेवला आहे. |
| ०४. | Kiosk मशीन्सची वार्षीक देखभाल/दुरूस्ती करार हे जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व यांचे अधिपत्याखालील असणारे जिल्हा न्यायालये, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, दिवाणी न्यायालये कनिष्ठ स्तर, या तालुका न्यायालयान करिता राहील. |
| ०५. | मुख्यालयी असलेल्या अभियंत्यास दुरध्वनी व्दारे Kiosk Machines दुरूस्ती संदर्भात तक्रार दिल्यास त्यांना त्यांची नोंद घ्यावी लागेल व ती त्यांना स्विकारावी लागेल. |
| ०६. | तालुक्या न्यायालयातील Kiosk Machines दुरूस्तकरते वेळी सुटे भाग दुरूस्ती करिता नेल्यास दोन दिवसाचे आंत सदरहु सुटे भाग दुरूस्त करून जोडणे बंधनकारक राहील |
| ०७. | निवीदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अंतीम अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीशसो कोल्हापूर यांना राहतील. |
| ०८. | वरील नमुद न्यायालयातील Kiosk Machines हे Linux/Ubantu Operating System/Case Information System यासाठी वापरली जातात यांची नोंद घ्यावी. |
| ०९. | दरपत्रक मंजुर झाल्यावर संबंधीतास १००/- रूपयाचे बॉन्डपेपरवर आपला करार करून दयावा लागेल व सदरहु १००/- रूपयाचे बॉन्डपेपरचा खर्च संबंधीतास सोसावा लागेल. सदरचा करार हा कराराचे दिनांकापासून एका वर्षाचा राहील. |
| १०. | वार्षिक देखभाल/दुरूस्ती करारावर राज्य व केंद्र सरकारचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर जसे की,(G.S.T Income Tax, etc) दरपत्रक मंजुर झालेल्या संबंधीतास व्यवसायीकाला/सेवापुरवठादाराला सोसावे लागतील या कार्यालयाकडून सदर प्रकारचे कोणतेही कर संबंधीतास अदा करण्यात येणार नाहीत. |

| | |
|---|---|
| ११. | सव्हरची सर्वसमावेशक (Comprehensive) देखभाल/दुरूस्ती करार असल्यामुळे त्यांची विविध सुटे पार्ट करणे व दुरूस्त न झाल्यास बदलुन देणे करारामध्ये समाविष्ठ राहतील त्याबाबतचे वेगळे देयक अदा केले जाणार नाही. |
| १२. | देयक हे त्रेमासिक पध्दतीने सादर केल्यावर नियमानुसार अदा करण्यात येईल. |
| १३. | देयक हे संपूर्ण तपशिलासह या कार्यालयाला सादर करावे लागेल. |
| १४. | राज्य व केंद्र सरकारचे सर्व कर वगळुन देयक अदा करण्यात येईल. |
| १५. | एखादया निवीदाधारका विरुध्द खरेदी प्रक्रिये संदर्भात दिवाणी दावा अथवा फौजदारी खटला असल्यास त्यांनी निवीदा भरु नयेत, तसे निदर्शनास आलेस कायदेशीर कारवाई केली जा◌ाईल. |
| १६. | पुरवठादारांनी या कार्यालयाने ज्या प्रकारचे साहित्याची मागणीची निवीदा प्रसिध्द केलेली आहे त्याच प्रकारच्या साहित्याची निवीदा भरणेची आहे. अन्य निवीदेचा विचार केला जाणार नाही. |

**<u>प्रत माहितीकरिता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरिता.</u>**

१) संगणक विभागप्रमुख, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर यांना सुचित करणेत येते कि, सदरील निवीदा जिल्हा न्यायालय, कोल्हापुर च्या (http://ecourts.gov.in/kolhapur) वेबसा◌ाइटवरती प्रकाशीत करणेत यावी.

२) मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

३) मा. तहसिलदार, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

४) मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

५) जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

६) मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, कोल्हापूर नोटीस बोर्ड.

७) कोल्हापूर महानगरपालीका कोल्हापूर नोटीस बोर्ड.